नियमित दिवाणी दावा क्र.३२/२०२५
रमेशचंद्र वि. विजया

MHJN080000852025

निशाणी क्र.०५ खालील आदेश
(दिनांक २७/०३/२०२५)

प्रस्तुत अर्ज वादीने न्यायालयीन आयुक्त नेमणुक होणेकरीता केलेला आहे.

२) वादीने असे कथन केले की, मुळ दावा अतिक्रमणीत क्षेत्राचा वादीस प्रतिवादी कडून ताबा मिळणे बाबत दाखल केले आहे. वादीने अतिक्रमण निश्चीत करण्यासाठी मोजणी होवुन मिळावी याकरीता भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी यांना अर्ज केला होता. परंतु सदर कार्यालयाने मोजणी न करता न्यायालयात जाण्याचे सांगितले. त्यानंतर वादीने वादग्रस्त गटाचे खाजगीरीत्या मोजणी केली होती त्यानुसार पश्चिम बाजूने १ हे. ०० आर प्रतिवादीने अतिक्रमण केल्याचे आढळुन आले आहे. वादीच्या मालकी व ताब्यातील गट क्र.४३५ वर प्रतिवादीने केलेले अतिक्रमण निश्चीत करण्यासाठी भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करुन त्यांच्या मार्फत गट क्र.४३५ व त्यालगताचे गट मोजुन वादीच्या जमीनीवर अतिक्रमण निश्चीत करण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३) प्रतिवादीने नि.क्र.१० वर त्यांनी पुरसीस दाखल केली. त्यात तिने सदर अर्ज मंजुर करण्यास कोणताही आक्षेप अथवा उजर नसल्याचे सांगितले. तसेच दावामिळकतीची मोजणी होताना न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करणे न्याय व योग्य असल्याचे सांगितले.

४) अभिलेखाचे अवलोकन केले व वादीच्या विधिज्ञानी युक्तिवाद केला.

५) या आदेशाचे योग्य ते न्यायनिर्णयासाठी मी खालील मुद्दे निर्धारीत करुन त्यावर माझा निष्कर्ष खालील दिलेल्या कारणास्तव नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक वादविषयाबाबत योग्य न्यायदान करण्यासाठी आवश्यकता आहे का ? | होय. |
| २) | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

६) अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमणीत जमीनीचा ताबा मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना दावा समन्स तामील झालेले असुन त्यांनी सदर प्रकरणात हजर होवुन दावा जमीन मोजणी करण्याच्या अर्जास हरकत घेतलेली नाही.

७) मा. उच्च न्यायालयाने या पुढील न्यायनिर्णयामध्ये ***Shri Bhupendra s/o Bhagwat Turkar Vs. Shri Homeraj s/o Zituji Meshram reported in 2014(3) All MR 365,*** 'The Hon'ble our High Court held that, *in the cases of boundary dispute and identity of the land, measurement thereof and area of the land is needed to be considered preferably on the basis of authentic evidence and map of the land drawn by competent public official. It is further held that, it is always desirable to get the suit land or field measured by an expert or competent public official to find out the area of the suit land encroached upon more so, when oral evidence can not help the Court.* In view of above ratio, in this case also, there is requirement to get measure the suit land', असे निर्णय आलेले आहे. वरील न्यायनिर्णयाच्या आधारे या प्रकरणामध्ये या मताला आले आहे की, या प्रकरणात अतिक्रमणाचा वाद असल्याचे न्यायालयीन आयुक्त नेमल्यावर सदरचे प्रकरणात निर्णय करणे सोयीचे होईल. वादी यांच्या म्हणण्यानुसार न्यायालयीन आयुक्त नेमणुक केल्यास कोणाचेही नुकसान होणार नाही.

नियमित दिवाणी दावा क्र.३२/२०२५
रमेशचंद्र वि. विजया

८) सदर बाब लक्षात घेता, न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती केल्यास निश्चितच दाव्याच्या परिणामकारक निकालासाठी व उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी मदत होईल. तसेच, सदर न्यायालयीन आयुक्तची मागणी ही पुरावा गोळा करण्यासाठी केलेली दिसुन येत नाही. करीता, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश

१. तालुका निरीक्षक भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी, ता. घनसावंगी, जि. जालना यांना सदर प्रकरणात न्यायालयीन आयुक्त म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे.

२. न्यायालयीन आयुक्ताने मौजे कुंभार पिंपळगाव, ता. घनसावंगी, जि. जालना येथील गट क्र.४३५ ची तसेच लगतच्या शेतजमीनींची मोजणी करुन भूमापन संहिते अन्वये करावी व मोजणी नकाशा तयार करुन सविस्तर मोजणी अहवाल नकाशासह न्यायालयात दिनांक ०९/०५/२०२५ पावेतो सादर करावा.

३. मोजणीसाठी आवश्यक दस्तऐवज पुर्तता उभयपक्षांनी तात्काळ करावी.

४. न्यायालयीन आयुक्ताचा आवश्यक तो खर्च वादीने सोसावा व तो खर्च भूमी अभिलेख कार्यालय, घनसावंगी येथे भरावा.

५. न्यायालयीन आयुक्त नियुक्तीची पत्र देण्यात यावे.

दिनांक २७/०३/२०२५

स्वाक्षरीत/-
(श्रीमती एल. एन. पांचाळ)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
घनसावंगी.